—: प्रेस नोट :— दिनांक ०७/०१/२०२५

**माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे मुंबई अग्निशस्त्राचा वापर करून जबरी चोरी करून सोन्याचे दागिणे लुटणाऱ्या टोळीतील सदस्याला अटक केलेबाबत.**

*****

फिर्यादी नामे — चिराग प्रविणकुमार धंदुकीया याने माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिली होती की, दिनांक ०६/०१/२०२५ रोजी रात्री २२:३० वाजण्याच्या सुमारास ब्लु गेट समोर, उत्तर वाहिनी रोडवर, पी. डी. मेलो रोड, मुंबई येथुन फिर्यादी व त्यांचे नातेवाईक हे मोटार स्कुटीवरून जात असताना तीन ते चार अनोळखी इसमांनी फिर्यादी यांची मोटार स्कुटी थांबवुन त्यांना मारहान करून त्यांचेकडे असलेल्या बंदुकीने फिर्यादी यांचे पुतण्यावर दोन गोळया झाडुन त्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व फिर्यादी यांचे अंदाजे ४७,२७,०००/— किंमतीचे सोन्याचे दागिणे बळजबरीने हिसकावुन जबर मारहाण केली म्हणुन अनोळखी इसमांविरूद्ध सी.सी.टी.एन.एस. क्र. ०८/२०२५, कलम ३११, ३(५) भा.न्या.सं. २०२३ सह ३, २५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहुन मा. वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाण्यास स्तरावर विविध पथकांचे स्थापना करून तांत्रिक तपासाद्वारे गुन्हा दाखल झाल्यापासुन केवळ आठ तासाच्या आत यातील पुरूष आरोपी क्रमांक १ अंदाजे वय ४७ वर्षे, राहणार एल.टी. मार्ग, मुंबई व पुरूष आरोपी क्रमांक २ अंदाजे वय ४५ वर्षे, राहणार डोंगरी, मुंबई यांना अटक करून त्यापैकी आरोपी क्रमांक १ याचेकडुन गुन्हयातील जबरीने हिसकावुन नेलेल्या मुद्देमालापैकी अंदाजित किंमत १६,५०,०००/— चे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहे. दोन्ही आरोपीतांस विहीत वेळेत कोर्टात हजर करीत आहे. दोन्ही आरोपीतांवर मुंबई शहरात विविध पोलीस ठाणेस गुन्हे नोंद आहेत. तसेच गुन्हयातील इतर आरोपींताचा शोध चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का.वसु.), मुंबई, श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त (द.प्रा.वि.), डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ १), डॉ. प्रविण मुंढे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डोंगरी विभाग), श्री. तन्वीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष धनवटे, पो.नि. श्री फरीद खान (गुन्हे), पो.नि. श्री. हेमंत बेंडाळे (कावसु), स.पो.नि. प्रविण शिंदे, पो.उ.नि. सुरज देवरे व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी केलेली आहे.

—०—